दै. पुण्यनगरी दि. ०५/०७/२०२५

# पोलिसांच्या निर्भय वारीमुळे महिलांना मिळाले









## पोलीस अधीक्षकांसह इतर अधिकारी सहभागी, महिलांसह तरूणींचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**नांदेड / प्रतिनिधी**

आषाढी एकादशीनिमित्त महाराष्ट्राचे दैवत पांडुरंग ...या दर्शनाची लागलेली आस ही वारकरी समाजासाठी ...व्हाळ्याचा विषय असतो. याच पार्श्वभूमीवर जिल्हा ...लीस दलातर्फे अनोखा उपक्रम चालू करत यात ...हिलांना आत्मविश्वास व बळ मिळण्यासाठी पोलीस ...धीक्षक अबिनाश कुमार यांच्या कल्पनेतून निर्भया ...रीचे आयोजन शुक्रवारी (दि. ४ जुलै) करण्यात ...ले होते.

निर्भया वारी आयटीआय येथील महात्मा फुले पुतळा ते विसावा गार्डन पर्यंत काढण्यात आली. त्यात विविध क्षेत्रातील महिला, तरुणी सहभागी झाल्या होत्या. जिल्हा पोलीस दलाकडून सामाजिक बांधिलकी म्हणून मिशन सहयोग अंतर्गत ८ नाविण्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहेत. आषाढी एकादशीचे औचित्य साधून पोलीस दलाकडून चालू असलेले मिशन निर्भया व मिशन समाधान अंतर्गत शालेय विद्यार्थी व बालकांसाठी निर्भया वारीचे आयोजन करण्यात आले होते. या अभिनव उपक्रमा अंतर्गत पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांचा मानस होता की, शालेय विद्यार्थी व बालक यांना त्यांच्या शाळा, शिकवणी वर्ग यांच्या व्यस्ततेमुळे तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या कर्तव्यामुळे बऱ्याच वेळेस पंढरपूरच्या वारीमध्ये सहभाग नोंदविता येत नाही. तसेच सदर निर्भया वारीव्दारे बालक, पालक व समाजामध्ये विविध विषयाबाबत जनजागृती व्हावी, म्हणून निर्भया वारीचे आयोजन करण्यात आले होते.

निर्भया वारीस महात्मा फुले पुतळा येथून पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या हस्ते सुरूवात करण्यात आली. यामध्ये शहरातील विविध शाळा महात्मा फुले, विजयनगर, महात्मा फुले व सावित्रीबाई फुले हायस्कूल बाबानगर, गुजराती हायस्कूल, गुरूकुल, चैतन्या ई-टेक्नो स्कुल, केंद्रीय विद्यालय, स्टुडंट पोलीस कॅडेट, ५२ बटालियनचे एनसीसी कॅडेटस, श्री विमलेश्वर वारकरी शिक्षण संस्था आदी विद्यार्थ्यांनी विठ्ठल, रुक्मिणी, ... करून टाळ, मृदंग, चिपळ्या, भजन... करत उत्साहामध्ये सहभाग नोंदवि... विठ्ठल, रुक्मिणी व लहान वारक... ठरले होते.

यावेळी पोलिस अधीक्षक अबि... पोलिस अधीक्षक गुरव आणि पोलि... अश्विनी जगताप यांनी विद्यार्थ्यांम... फेर धरला तसेच टाळ वाजवून... मुख्यालय येथील नवप्रशिक्षीत